# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १६६ वा मंगळवार दि.२८ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ज्या शाळेत तुम्ही शिकला, ती आम्ही बांधली



हैदराबाद : तेलंगणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचा प्रचार जोरात सुरू आहे. पक्षाचे नेते राज्यात विविध ठिकाणी सभा घेत आहेत. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी रविवार दि. २६ नोव्हेंबर तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि बीआरएस प्रमुख के. चंद्रशेखर राव यांच्यावर निशाणा साधला. काँग्रेसने तेलंगणात काय काम केले? असा प्रश्न केसीआर यांनी एका सभेतून काँग्रेसला विचारला होता. त्यावर उत्तर देताना राहुल गांधींनी केसीआरवर निशाणा साधला. राहुल म्हणाले, काँग्रेसने काय केले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काँग्रेसने काय केले ते मी त्यांना सांगतो. ज्या रस्त्यांवर केसीआर चालत आहेत, ते रस्ते काँग्रेसने बांधले आणि ज्या शाळाकिंवा विद्यापीठात त्यांनी शिक्षण घेतले, तेदेखील काँग्रेसनेच बांधले आहे, अशी बोचरी टीका राहुल गांधी यांनी केली. राहुल गांधी पुढे म्हणाले की, पीएम मोदी जे काही बोलतात, तेच केसीआरही बोलतात. केसीआर संसदेत पंतप्रधान मोदींना मदत करतात आणि मोदी राज्यात केसीआर यांना मदत करतात. मी पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात लढतो. माझ्यावर २४ केसेस आहेत. ईडीने पाच दिवस माझी ५५ तास चौकशी केली. माझे लोकसभेचे सदस्यत्व रद्द करण्यात आले, माझे घर काढून घेण्यात आले. केसीआरवर एकही केस नाही, त्यांना धमकी येत नाही. केसीआर पंतप्रधान मोदींसोबत नसतील तर, मग त्यांच्यावर गुन्हा का दाखल नाही? माझे दोन लक्ष्य आहेत, पहिले म्हणजे केसीआरला हरवणे आणि त्यानंतर केंद्रात मोदींना हरवणे, अशी टीकाही राहुल यांनी यावेळी केली.

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य खंडाचे फकिरा ब्रिगेडच्या वतीने मोफत वितरण

लातूर (प्रतिनिधी) साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे अत्यंत दुर्मिळ साहित्य शासनाच्या अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीने दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी मुंबई येथे प्रकाशित केले आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे आठ खंड महामहीम राज्यपाल श्री रमेशजी बैस,मुख्यमंत्री मा .ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस समितीचे अध्यक्ष तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री,मा .ना.चंद्रकांत पाटील, विधानसभेचे अध्यक्ष मा.ड.राहूल नार्वे कर,उपाध्यक्ष मा .निलम गोऱ्हे,शालेय शिक्षण मंत्री मा .ना.दिपक केसरकर,कौशल्य विकास मंत्री मा .ना.मंगलप्रभात लोढा, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा.विकासचंद्र रस्तोगी, निमंत्रक मा.डॉ.शैलेंद्र देवळाणकर, समितीचे सदस्य सचिव प्रा.डॉ.संजय शिंदे, सर्व समिती सदस्य यांच्या उपस्थितीत प्रकाशित केले ,पहिले तीन खंड कादंबरीचे असून यामध्ये तीस कांदब-यांचा समावेश आहे.चौथा खंड कथांचा आहे या मध्ये दहा कथासंग्रहातील कथांचा समावेश केला आहे.हे आठ भाग शासनाच्या मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय बुक डेपो मध्ये विक्रीसाठी उपलब्ध करून दिले आहेत; परंतु इतर जिल्ह्यांत हे दुर्मिळ ग्रंथ मिळत नाहीत म्हणून फकिरा ब्रिगेडच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात वरील ग्रंथाचे मोफत वाटप करण्यात येणार असल्याची माहिती फकिरा ब्रिग्रेडचे राज्य कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर, प्रदेशाध्यक्ष श्रीरंग सरवदे यांनी दिली आहे. तसेच या खंडाचे शासनाने मोफत ऑडिओ आणि ईबुक सुध्दा तयार करून वितरीत केले आहे.सदरील खंडाच्या प्रत्येक भागाची किंमत साठ रुपये इतकी माफक ठेवली आहे.हे सर्व खंड फकिरा ब्रिगेडच्या वतीने लातूरमधील वाचक, अभ्यास, संशोधक, यांना मोफत वितरीत करण्यात येणार आहेत. ज्यांना खंड हवे असतील अशा व्यक्तींनी फकिरा ब्रिगेडच्या खालील पदाधिकाऱ्यांना मोबाईल करून आपली नोंदणी करावी





१) प्रा. राजेंद्र लोदगेकर - ७९७२६८१५१९
२) पांडुरंग मस्के-९०९६६९५२६२
३) संजय विरूळे-८०८०१३२३१५
४) निर्मला नवगिरे-८६३७७८३१५९
५) गोविंद धबडगे-७८७५२४३३००

या कार्यकर्त्यांना संपर्क साधावा असे आवाहन जिल्हाध्यक्ष सचिन शिंदे, बाळासाहेब वाघमारे, सूर्यकांत कदम,बाळू पटनुरे, मुकेश लोंढे, गहिनीनाथ मस्के, ऋषी भडंगे यांनी केले आहे

आपला विश्वासू, प्रा.राजेंद्र लोदगेकर

# व्ही एस पँथर्स च्या वतीने संविधान दिनानिमित्त ४४८ फुटी तिरंगा ध्वज पदयात्रा आणि संविधान दालन ची उभारणी ...







लातूर : येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने आज संविधान दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क पर्यंत ४४८ फुटी तिरंगा ध्वज घेऊन भव्य पदयात्रा व्ही एस पँथर्स सं अध्यक्ष विनोद खटके आणि प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. यावेळी प्रथमतः डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक याठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .यानंतर सामूहिक राष्ट्रगीत म्हणण्यात आले यानंतर पूज्य भन्ते पैय्यानंद यांनी प्रस्ताविकेचे वाचन केले यावेळी जिल्हा बँकेचे बँकेचे संचालक पृथ्वीराज सिरसाट, माजी महापौर दिपक सुळ, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण जाधव, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार केशव कांबळे, बालाजी कांबळे, ख्रिस्ती धर्मगुरु ,हिंदू धर्मगुरु ,मौलवी ,मुस्लिम समाजाचे नेते अफजल कुरेशी, ला.रा. शेख,विकास कांबळे यांची देखील उपस्थिती होती .

# केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून द्यावा- आ. कराड

## रेणापूर तालुका भाजपा किसान मोर्चा पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र वाटप






लातूर दि. २७- पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी नव्याने सुरु केलेल्या विश्वकर्मा योजनेचा बारा बलुतेदारांना त्याचबरोबर केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून द्यावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुका किसान मोर्चा नूतन पदाधिकाऱ्यां नियुक्ती पत्र वितरण प्रसंगी बोलताना केले. लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात रेणापूर तालुका किसान मोर्चा नूतन पदाधिकाऱ्यांना आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्तीपत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास भाजपाचे तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष वसंत करमुडे, भाजयुमो तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, पानगाव शहराध्यक्ष गणेश तुरुप, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष जयप्रकाश जटाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. नुतन पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या जबाबदारीनुसार संघटनात्मक बांधणी करुन भाजपा मजबुत करावी. पक्षाचे सर्व कार्यक्रम प्रभाविपणे राबवावे असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाने गोर गरीब सर्वसामान्य माणसाच्या हिताच्या अनेक योजना सुरु केल्या असून या योजना गावागावात आणि घराघरात पोहंचविण्यासाठी पाठपुरावा करावा. शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य शासनाकडून दोन दोन हजार रुपये अनुदान दिले जात आहे. एक रुपयात काढण्यात आलेल्या पिकविम्याची पंचेविस टक्के अग्रीम रक्कम वाटपाचे काम सुरु झाले असून मोफत मिळणाऱ्या अन्नधान्य वाटपास पाच वर्षाची मुदतवाढ दिली असल्याची माहीती दिली. भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रेणापूर तालुका किसान मोर्चाचे नूतन पदाधिकारी उपाध्यक्ष आनंतराव माने, बलभीम जाधव, भारत शिंदे, गोविंद मुंडे, आबासाहेब चव्हाण, परमेश्वर दंडे, अशोक गंगथडे, प्रकाश बरुरे, नवनाथ रांजणे, सरचिटणीस विक्रम फुलसे धोंडीराम ठोंबरे अच्युत मुंडे चंद्रकांत सूर्यवंशी दत्ता जाधव चिटणीस विकास सरवदे, लक्ष्मण भंडारे, अंकुश लोणकर, प्रमोद कुटवाड, मनोज पाटील, दत्ता धायगुडे, नरसिंग मरलापल्ले, माणिक भुरे, अरविंद बरुरे, नरसिंग साळुंखे, सतीश बाडे, श्रीमंत घुगे, संजय पिंपळे, मारुती हाके कार्यकारणी सदस्य महादेव बंद बालासाहेब आरदवाड, साहेबराव माने, तातेसाहेब आडतराव, बाबुराव बोळंगे, नारायण होळंबे, ज्ञानोबा औसेकर, श्रीराम कस्पटे, व्यंकट आगाव, वैजनाथ केंद्रे, व्यंकट सोनवणे, नरेश भताने, अरविंद दाडगे, गुरुनाथ पनगुडे, गोविंद मोटेगावकर, रमेश बडे, सुनील बुड्डे, गोविंद पनगुले, व्यंकटराव देशमुख, विनोद राऊत, ज्ञानोबा घुले, लिंबराज जाधव, दयानंद सोमवंशी, विनायक साळुंखे, बालासाहेब कराड, माऊली जाधव, राम अडसुळे, रामेश्वर शिरसाट यांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले.

# पाकिस्तानला बीसीसीआयची भीती ? चॅम्पियन्स करंडकाचेही गमावले जाऊ शकते यजमानपद

दोन वर्षानंतची चॅम्पियन्स करंडक एकदिवसीय स्पर्धा पाकिस्तानमध्ये होण्याचा आयसीसीने मंजुरी दिलेली असली तरी बीसीसीआय या स्पर्धेचे यममानपद आपल्याकडून कधीही हिसवावू शकते याची भिती पाकिस्तान मंडळाला आहे.एखाद्या बहुराष्ट्रीय स्पर्धे चे यजमानपद दिल्यानंतर आयसीसी आणि यजमान देशाचे क्रिकेट मंडळ यांच्यात यजमानपदाचा करार केला जात असतो तसा २०२५ मध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स करंडक स्पर्धेबाबत आयसीसी आणि पाक मंडळ यांच्यात झालेला नाही. हा करार लवकरात लवकर करावी अशी मागणी पाक मंडळ आयसीसीकडे करत आहे.विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धे च्या अंतिम सामन्यासाठी पाक मंडळाचे अध्यक्ष झाका अश्रफ आणि त्यांचे सीओओ सलमान नासीर अहमदाबादमध्ये आले होते त्यावेळी उपस्थित असलेल्या आयसीसीच्या कार्यकारी मंडळाबरोबर या दोघांनी चर्चा केल्याची माहिती सुत्रांनी दिली. सुरक्षिततेच्या कारणावरुन बीसीसीआय आपला संघ पाकमध्ये पाठवण्यास नकार देऊ शकते. बीसीसीआयला असा कोणताही निर्णय घेऊ देऊ नका असे मागणी पाक मंडळाचे सदस्य आयसीसीकडे करत होते. इतकेच नव्हे तर सुरक्षिततेची पाहणी करण्यासाठी आयसीसीने स्वतःची समिती स्थापन करावी अशीही मागणी त्यांनी केली. या समितीने पाकिस्तान सरकार आणि सुरक्षा अधिकाऱ्यांशी चर्चा करुन अहवाल द्यावा असेही अश्रफ आणि सलमान नासीर यांनी म्हटल्याचे समजते. पाकिस्तान आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यास सुरक्षित आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संघ पाकमध्ये येऊन खेळले आहेत, असाही दाखला या दोघांनी आयसीसीकडे दिला

## संपादकीय....

# निवडक नियमन!

कोणावरही कारवाई करताना ती कोणत्या कारणांसाठी केली जात आहे याची किमान माहिती देण्याची गरज सध्या चलती असलेल्या काही सरकारी यंत्रणांस अलीकडे वाटेनाशी झाली आहे. 'अभ्युदय'सारख्या सहकारी बँकांवर कठोर नियमपालन करणारी रिझव्र्ह बँक स्वत:च्या नियंत्रणाखालील सरकारी आणि खासगी बँका चोख चालाव्यात यासाठी अशी चटकन कारवाई करते का? कोणावरही कारवाई करताना ती कोणत्या कारणांसाठी केली जात आहे याची किमान माहिती देण्याची गरज सध्या चलती असलेल्या काही सरकारी यंत्रणांस अलीकडे वाटेनाशी झाली आहे. अशा माननीय यंत्रणांच्या यादीत स्थान मिळविण्याचे डोहाळे रिझव्र्ह बँकेस लागले आहेत किंवा काय हे कळण्यास मार्ग नाही. तथापि या बँकिंग नियंत्रकाने ज्या पद्धतीने अचानक अभ्युदय सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून बँकेचा कारभार प्रशासकाहाती दिला त्यावरून असा संशय येण्यास जागा आहे. तीन महिन्यांपूर्वी, सप्टेंबरात झालेल्या या बँकेच्या लेखापरीक्षणात नियामकांस असे काही आक्षेपार्ह आढळले होते काय, त्याची माहिती संचालकांस देण्यात आली होती काय याबाबत सविस्तर तपशील अद्याप अधिकृतपणे उपलब्ध नाही. पण 'अभ्युदय'ची अनुत्पादक कर्जे वाढली होती आणि त्यांचे प्रमाण १२ टक्क्यांच्या वर गेले होते, संचालकांनी त्यांच्या राजकीय उद्दिष्टांसाठी बँकेच्या निधीचा वापर केला इत्यादी कारणे या संदर्भात चर्चिली जातात. त्यास रिझव्र्ह बँकेचा दुजोरा अद्याप तरी नाही. त्यामुळे त्याच्या वैधावैधतेबाबत तूर्त चर्चा करणे योग्य ठरणार नाही. हा तपशील उपलब्ध होईपर्यंत या कारवाईबाबत काही प्रश्नांची चर्चा करणे गरजेचे ठरते. याचे कारण सहकारी बँकांबाबत रिझव्र्ह बँकेचे धोरण अत्यंत पक्षपाती आहे आणि याचे अनेक दाखले आतापर्यंत देण्यात आलेले आहेत. आणि दुसरे असे की बँकेची बुडीत वा अनुत्पादक कर्जे वाढण्याबाबत नियामक रिझव्र्ह बँक सरसकट इतकीच जागरूक आणि हळवी असती तरी ताजी कारवाई स्वीकारार्ह ठरली असती. रिझव्र्ह बँकेचा इतिहास तसा नाही. अनुत्पादक कर्जे वाढणे हे कारवाईचे कारण असेल तर मग सरकारी मालकीच्या 'आयडीबीआय' बँकेबाबत रिझव्र्ह बँकेने काय केले? या बँकेच्या अनुत्पादक कर्जाचा टक्का दोन दशकी पातळी ओलांडत होता. तेव्हा रिझव्र्ह बँक कोठे पाहात होती? नीरव मोदी हा दोन्ही हातांनी 'पंजाब नॅशनल बँके'स लुटत होता तेव्हा रिझव्र्ह बँक किती जागी होती? वाधवान बंधूंच्या उद्योगांमुळे 'पंजाब अँड महाराष्ट्र सहकारी बँके'चे बंबाळे वाजले तेव्हा त्याआधी ही बँक वाचावी यासाठी रिझव्र्ह बँकेने कोणते उपाय योजले? बँकेचे संस्थापक राणा कपूर यांच्या हस्तेच 'येस बँक' हवे ते उद्योग करीत होती त्याचा किती सुगावा रिझव्र्ह बँकेस वेळेवर लागला? असे अनेक दाखले देता येतील. सगळय़ाचा अर्थ तोच. सरकारी मालकीच्या आणि खासगी बडय़ा बँकांच्या उद्योगांकडे काणाडोळा करायचा आणि अनाथ नागरी सहकारी बँकांसमोर नियामक शौर्य दाखवायचे. त्यातही एखाद्या सहकारी बँकेचे प्रवर्तक वा संचालक सत्ताधाऱ्यांशी निगडित असतील तर तिकडे डोळेझाक करण्यात अनमान करायचा नाही, असे रिझव्र्ह बँकेचे वर्तन राहिलेले आहे. वास्तविक अनेक नागरी सहकारी बँका या किती तरी सरकारी बँकांपेक्षा कार्यक्षमतेने चालविल्या जात आहेत. पण रिझव्र्ह बँकेचा– आणि त्यामुळे केंद्रीय अर्थ मंत्रालयाचा– या बँकांबाबतचा दृष्टिकोन 'आपला तो बाब्या..' असाच राहिलेला आहे. 'अभ्युदय'वर कारवाईचा बडगा उभारणारी रिझव्र्ह बँक स्वत:च्या नियंत्रणाखालील सरकारी आणि खासगी बँका चोख चालवत असती तर तिच्या दृष्टिकोनाकडे एकवेळ दुर्लक्ष करता आले असते. पण वास्तव तसे नाही. रिझव्र्ह बँकेच्या थेट नाकाखाली असूनही सरकारी बँकांतील घोटाळे काहीही कमी झालेले नाहीत. पण त्यातील कोणास रिझव्र्ह बँकेने कधी शिक्षा केल्याचे दिसले नाही. आपल्या सर्व नियंत्रकांचे शहाणपण नेहमी अशक्तापुढेच चालते. रिझव्र्ह बँकही यातलीच. राष्ट्रीयीकृत बँकांच्या मागे साक्षात केंद्रीय अर्थमंत्रालय असल्याने या बँकांसमोर रिझव्र्ह बँक तेथील गैरव्यवहारांबाबत शेपूट घालणार आणि सहकारी बँकांवर डोळे वटारणार.याचमुळे सहकारी बँकांना फक्त रिझव्र्ह बँकेच्या नियंत्रणाखाली ठेवणे हा उपाय नाही. सुमारे आठ वर्षांपूर्वी, २०१५ साली, या संदर्भात नेमण्यात आलेल्या तत्कालीन डेप्युटी गव्हर्नर आर. गांधी यांच्या समितीने नागरी सहकारी बँकांच्या नियमनात सुधारणा करण्यासाठी व्यापक शिफारशी केल्या. याच अनुषंगाने फेब्रुवारी २०२१ मध्ये माजी डेप्युटी गव्हर्नर एन एस. विश्वनाथन यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारसीही उल्लेखनीय ठरतील. सहकारी बँकांना अन्य राष्ट्रीयीकृत बँकांपासून वेगळे काढून त्यांच्या नियमनासाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभारावी ही त्यातील एक अत्यंत महत्त्वाची. या यंत्रणेच्या नियमनाखाली सहकारी बँकांनी एक व्यवस्थापन मंडळ नेमावे आणि ते सहकारी बँकांच्या संचालक मंडळाच्या वर असेल, असे प्रस्तावित होते. तसेच या बँकांचे रिझव्र्ह बँकेच्या देखरेखीखाली 'स्मॉल फायनान्स बँकां'त रूपांतर केले जावे असेही गांधी समितीने सुचवले होते. परंतु अन्य कोणत्याही सरकारी समित्यांच्या अहवालांचे जे होते तेच या समित्यांच्या अहवालांचेही झाले. ते बासनातच राहिले. सहकारी बँकांची कामगिरी सुधारावी यासाठी रिझव्र्ह बँकेस खरोखरच तळमळ असती तर आपल्याच माजी डेप्युटी गव्हर्नरांच्या या अहवालांवर काही कारवाई झाली असती. तसे काही न करता रिझव्र्ह बँक अत्यंत अमानुषपणे या क्षेत्रास वागवत राहिली. बरे या सहकारी बँका आकाराने लहान आहेत म्हणून असे होते म्हणावे तर तसेही नाही. उच्चभ्रूंच्या वित्तसंस्था नुसत्या कण्हल्या तरी उपायांची सत्वरता दाखवणाऱ्या रिझव्र्ह बँकेस मध्यमवर्गीयांच्या सहकारी बँकांनी टाहो फोडला तरी त्यांची कणव येत नाही, यास काय म्हणणार? 'लक्ष्मी विलास बँक' बुडू नये म्हणून कसलीही चाड न बाळगता रिझव्र्ह बँक ती बँक सिंगापुरी बँकेच्या पदरात घालते. पण 'पंजाब अँड महाराष्ट्र सहकारी बँक' बुडाली तरी त्याबाबत, तिच्या ठेवीदार, गुंतवणूकदारांबाबत रिझव्र्ह बँकेच्या हृदयात पाझर फुटत नाही, याचा अर्थ लावणे अवघड नाही.इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रास याची झळ अधिक कारण सहकार क्षेत्रातील बँका प्राधान्याने महाराष्ट्रात अधिक. त्यातही नागरी सहकारी बँकांवर संघप्रणीत संस्थांचे प्राबल्य. यातील अनेक बँकांचा कारभार उत्तम सुरू आहे, हे मान्य करावेच लागेल. तथापि या क्षेत्राच्या अडचणी सोडवण्यास गती यावी म्हणून विद्यमान सरकारने सहकार चळवळीशी संबंधित सतीश मराठे यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीस संचालक मंडळात नेमले.


# आंबेडकरांची ऐतिहासिक संविधान सन्मान सभा

अंगात ताप, सातत्याने खोकला, अँटीबयोटिक्स चा कोर्स आणि डॉक्टर सल्ला की विश्रांती घ्या आणि गर्दी–धुळीपासून दूर रहा. दुसरीकडे टीवि वर सातत्याने बातम्या वंचित बहुजन आघाडीची शिवाजी पार्क वर संविधान सन्मान महासभा प्रमुख मार्गदर्शक : वंचित चे राष्ट्रीय नेते अॅड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे महासभेला जाण्याची जिद्द आणि जिवाची घालमेल तेंव्हा वंचित अघाडी नवी मुंबई धडाडीचे कार्यकर्ते – कल्यानराव हनवते यांना फोन केला ते म्हणाले साहेब आम्ही दोन वाजतापासून नवी मुंबईतून बसेस काढत आहोत,

तुम्ही पण या ; त्यांना तब्येती बाबत सांगितले आणि संविधान सन्मान सभेसाठी शुभेच्छा दिल्या. दोन तास विश्रांती घेतली; संध्याकाळी ६ वाजता उठलो .. अतिशय अस्वस्थ होतो.. नेहमी प्रत्येक भाषणाचा आणि पोस्ट च्या अंती जय भारत जय संविधान लिहिणारा मी, संविधान सन्मान सभेसाठी जाऊ शकत नाही. अस्वस्थता नीलिमा समोर व्यक्त केली; ती म्हणाली ठरवल तर तुम्ही काही करू शकता .. बस शर्ट घातल ; फूल बाह्याच काळ स्वेटर घातल ; कोरोंना काळातील काही मास्क शिल्लक होते; मास्क घातला . सोबत बाळासाहेब आंबेडकरांना भेटू शकल्यास, भेट द्यावी म्हणून, मी लिहिलेल्या मुख्यमंत्री या पुस्तकाची कॉपी घेतली; मराठा आरक्षण : सत्य आणि राजकारण या लेखाच्या १०० झेरॉक्स कॉपी घेतल्या.. टॅक्सी बोलविली आणि शिवाजी पार्क चा मार्ग धरला. थकवा खूप असल्यामुळे टॅक्सी त कधी झोपलो कळलेच नाही .. टॅक्सी वाल्याने दादर टीटी ला झोपेतून उठविले; टॅक्सी वाला म्हणाला सर डिस्टन्स तर फक्त ३ किलोमीटर आहे पण वेळ ५० मिनिट दाखवीत आहे; रस्त्यावर शिवाजी पार्क कडे जाणारे हजारोंचे पायी लोंढे ; त्या मुळे ट्राफिक जाम .. मोबाइल वर टीव्ही ९ लाईव लावले तर महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष माननीय नानाभाऊ पटोले भाषणासाठीं उभे राहिले होते. नानाभाऊ म्हणाले : बाळासाहेबांनी राहुल गांधीना संविधान सभेसाठी बोलविले होते; पन राहुल गांधी पाच राज्याच्या निवडणुकीत अडकले असल्यामुळे, राहुलजिनि मला पाठविले आहे. तेवढ्यात गाडी थोडी पुढे सरकली तर तर टॅक्सी वाला म्हणाला: सर टाइम अजून वाढला आहे ५५ मिनिट दाखवीत आहे .. शिवाजी पार्क कडे जाणारे टेम्पो, ट्रॉली , बसेस जिथे जागा मिळेल तिथे पार्क होत होत्या; किंवा हळू हळू सरकत होत्या .. नाना पटोलेचे भाषण संपल्यावर बहुदा बाळसाहेबांचे भाषण होईल असे वाटून ; मी टॅक्सी सोडली आणि तब्येत बरी नसतांनी सुद्धा पायी जाण्याचा निर्णय घेतला. पंधरा वीस मिनिटात शिवाजी पार्क गाठले. मैदानाच्या बाहेर आणि आत प्रचंड गर्दी होती. मैदानाच्या बाहेर भोंगयावरून मंडळी भाषण ऐकित होती ; कमीत कमी पाच लाख लोंग संविधान सन्मान सभेसाठी जमा झाले होते. बाळसाहेबांचे भाषण जवळून ऐकता यावे म्हणून पुन्हा कल्यानराव हनवते यांना फोन केला. त्यांनी सांगितले स्टेजच्या उजव्या बाजूला साऊंड सिस्टिमचे जे भोंगे लागले आहे ; तिकडे या. प्रमुख मंडळिणा बसायची सोय केली आहे. तेथे सोफ्यावर तीनच्या ठिकाणी चार बसवून तुमच्या बसायची व्यवस्था करतो. संपूर्ण शिवाजी पार्क च्या बाहेरून उजव्या बाजूचा रस्ता कसाबसा दहा मिनिटात एक दुसऱ्याला धक्का धक्का देत देत पार केला. साऊंड सिस्टम च्या जवळ पोहोचलो. मी पोलिसाना सांगितले विशेष अतिथि चा पास माझ्याजवळ नाही, परंतु मला तिथे बोलविण्यात आले आहे. पोलिसानी साफ मना केले. नाकावर मास्क घालून होतो; हातात पाण्याची,

पुस्तकाची थैली होती. मग मास्क काढून, मी पुन्हा पोलिसाना म्हटल : मी प्रदीप ढोबळे ओबीसी सेवासंघाचा अध्यक्ष; एक कार्यकर्त्याचा कानावर शब्द गेले; त्यांनी मला निरखून पाहिले; सुरक्षेसाठी नेमलेला तो कार्यकर्ता होता; त्याने पोलिसाना सांगितले .. सोडा त्यांना मी ओळखतो त्यांना .. तरी पोलिसाने फोटो परिचय कार्ड मागितले .. मी दाखविले .. आणि मग त्या कार्यकर्त्या नी मला विशेष अतिथि साठी असलेल्या सोफ्यावर बसविले. सभा दहा वाजता पर्यन्त संपवायची म्हणून महाराष्ट्रातील अनेक जिल्हयातून आलेले प्रमुख कार्यकर्ते भटके विमुक्त मुस्लिम ओबीसी मागासवर्गीय तृतीय पंथी यांनी पाच पाच मिनिटात परंतु अतिशय प्रभावी अशी भाषणे दिली. प्रत्येकाच्या आवाजात संविधान प्रेम आणि बाळसाहेबा साठी प्राण झोकून देण्याची निष्ठा होती. भारतीय संविधान आहे म्हणून आज आमचा आवाज आहे ; आमचे अस्तित्व आहे; आणि आज तेच संविधान धोक्यात आहे म्हणून संविधानसाठी कसलाही त्याग करायची भाषा मंचकावरून यायची आणि श्रोत्यांच्या उत्सुर्फ प्रतिसांदाने कधी घोषणेने तर कधी टाळ्याने आसमंत गुंजत होता. वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र अध्यक्ष रेखाताई ठाकूर पन बाळसाहेबणी अधिक बोलावे म्हणून थोडाच वेळ परंतु रोकठोक बोलल्या. खरतर ही सभा कोण के बोलतो या पेक्षा संविधान प्रेमी बहुजन समाजाच्या शक्ति प्रदर्शनाची होती. महाराष्ट्राच्या कोना कोपऱ्यातून कार्यकर्ते स्व खर्चावर आलेले होते; यात कुणीही पैसे देऊन वा कुठले आमिष दाखवून आणलेला नव्हता. प्रत्येक जन स्वतच्या आतल्या आवाज ऐकून आला होता. भारतीय संविधान धोक्यात असताना मी जर घरी बसलो तर मी सुद्धा संविधान द्रोही ठरू शकतो; या भावनेतून प्रत्येक संविधान प्रेमी तिथे आला होता आणि त्या सभेच नेतृत्व भारतीय संविधानचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा नातू बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर करीत आहे ही त्यातली महत्वपूर्ण बाब होती.भारतीय संविधानाच्या उडदेशिकेचे सामूहिक वाचन झाले आणि निवेदकणे बाळासाहेब आंबेडकरांचे नाव पुकारले ; बाळासाहेब बोलण्यासाठी माइकवर आले; पाच लाखाची टी सभा पूर्ण शांत झाली. सगळ्यांचे डोळे बाळासाहेबांना बघण्यासाठी तर कान त्याचे शब्द ऐकण्यासाठी टवकरलेले. तेवढ्यात कुठल्या एका कोण्यावरून जयभीम जयभीम चा नारा सुरू झाला आणि सभेतून लाटेसारखा एका दिशेकडून दुसरीकडे गुंजायला लागला; त्यास लगाम लावण्यासाठी बाळासाहेबांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली.

संभाच संविधान सन्मानासाठी असल्यामुळे सद्य स्थितीत संविधानाच्या बाबतीत हॉट असलेल्या वेगवेगळ्या चर्चा बाबत प्रश्न भाषणात उभा करण्यात आला. आज काही लोक उघड उघड तर काही लोक दबक्या आवाजात भारतीय संविधान जून झाले आहे म्हणून ते बदललेले पाहिजे असे म्हणतात. संविधान ही राज्य करण्याची व्यवस्था आहे. या व्यवस्थेवर लोकांचा विश्वास आहे .. आणि हा विश्वास सहजासहजी बसला नाही तर या साठी या देशात ७० वर्षाचा काळ जावा लागला. लोकशाही या संविधानाचा मूल गाभा आहे. आपले प्रश्न मिटो की न मिटों ; परंतु ते प्रश्न सरकार पुढे मांडण्याची सोय यात आहे.काही समस्या सुटल्या आहेत ; काही सुटतील अशी आशा आहे ; आणि म्हणूनच वेगवेगळ्या प्रकारची आंदोलन लोक करीत असतात. हे संविधान बदळायचे तर नवीन असे काय हे तरी संविधान बदलण्याची भाषा करणाऱ्याने सांगितले पाहिजे. त्यांना लोकशाहीच्या ठिकाणी ठोकशाही पाहिजे का ? आज दिवस भर्यात ७ ठिकाणी सरकारने धाडी टाकल्या आणि मागच्या दहा वर्षात हजारो धाडी टाकण्यात आल्या. धाडी टाकण्यात येतात ; चौकशी होत राहते ; परंतु खटले कोर्टात का येत नाहीत ? कारण या प्रक्रियेत धाड टाकलेल्या व्यक्तीस मुकाट्याने राहण्यास भाग पडले जाते; आवाज दाबला जातो; आणि संदेश देण्यात येतो की आमच्या विरुद्ध काही बोलला तर तुमचं आवाज बंद करण्याचे तंत्र आमच्या पाशी आहे. आज असलेल्या संविधानातील निवडक तरतुदीचा गैरवापर करीत जर हे होत असेल तर उद्या हेच संविधान राहिले नाही तर काय होईल हयाचा प्रत्येकाने फक्त अंदाज बांधाव. आणि त्यामुले भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी ही जी जन चर्चा आम्ही घडवून यांनीत आहोत; टी काँग्रेस पक्षाने देशभर घडवावी ह्यासाठीच मी राहुल गांधीना सभेचे निमंत्रण दिले होते.



२०२४ ल होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकी आधी ही चर्चा राष्ट्र व्यापी व्हावी हाच या संविधान सन्मान सभेचा मुख्य उद्देश आहे .

भारतीय संविधान एका भौगोलिक भारत नावाच्या राष्ट्रात लागू झाले आहे ; हिंदू बहुसंख्यकचा देश निर्माण झाला आहे; सत्तर वर्षापासून देश व्यवस्थित कार्यरत आहे; तेव्हा मोहन भागवत कुठल्या अखंड भारताचे स्वप्न दाखवून लोकांची दिशाभूल करीत आहेत .. अखंड भारत म्हणजे म्हणे थेट अफगाणिस्थान पर्यन्त पोहोचणे .. एक प्रकारे हे दुसऱ्या देशाणा आक्रमण करण्याचा धाक दाखविणे आहे तर दुसरीकडे बहुसंख्यक हिंदूच्या ठिकाणी पुन्हा बरोबरीने हिंदू मुस्लिम झाल्यास .. दोघेनाही एक दुसऱ्याच्या दहशतीत जागविणे होय .. मुसलमानाची दाढी हिंदूच्या हातात आणि हिंदूची शेंडी मुसलमानांच्या हातात .. बाबासाहेबनी आपल्या र्हिसहीं प झरज्झळींहरप या ग्रंथात संभाव्य धोक्याची संपूर्ण चर्चा केली आहे. पाहिजे असल्यास सर्वांनी हे पुस्तक वाचून पहावे.

बाबासाहेबांनी या देशातील मंगसवर्गीयांच्या सामाजिक संबलिकरणसाठी आरक्षणाची व्यवस्था दिली परंतु आज त्याच व्यवस्थेचा गैरवापर राजकीय मंडळी करीत आहे ; खतपाणी देऊन ; एक समाजास दुसऱ्या समाजा सोबत भिडविणे चालू आहे .. आधी मणीपुर मध्ये झाले .. आज महाराष्ट्रात ओबीसी मराठा वादातून तेच चालू आहे .. आणि ३ डिसेंबर ल जे निकाल येतील त्या नंतर देशात वातावरण अधिक बिघडण्याचे काम सुरू होऊ शकते ; तेव्हा सर्व सामान्य जनतेने अतिशय सावध राहणे गरजेचे .. नेते भडकवतील .. आणि जनता एकदुसऱ्यावर भिडेल .. तेव्हा नेत्याना म्हणा .. रस्त्यावरच्या मारमारीसाठि पहिले तुझा पोरगा उतरव .. त्यांची पोर उतरणार नाही .. जनतेने लक्षात ठेवले पाहिजे; जनता या देशाची मालक आहे आणि नेते हे त्यांचे सेवक .. त्यामुले जनतेने आपले मालकत्व सहजासहजी नेत्याना बहाल करू नये .. नेत्यानी आपापले धंदे शाबूत ठेवण्यासाठी देशाचा विकासच केला नाही .. आज भारतातून २० लाख विद्यार्थी परदेशात जातात; प्रत्येक विद्यार्थी ४० लाख रुपये खर्च करतो ..हा पैसा करोडोत आहे .. एवढा प्रचंड



पैसा देशातून बाहेर जातो .. हाच पैसा येथे विकासासाठी वापरला असतं तर येथेच उच्च दर्जाची शिक्षण व्यवस्था असती .. आणि कमीत कमी २० लाख नोकऱ्या या एका शिक्षण क्षेत्रात निर्माण झाल्या असत्या .. आज असलेल्या प्रचंड बेरोजगरीमुळे मराठा युवकणा वाटत आरक्षणणे आपल्याला नोकरी मिळाली तर आपला विकास होईल .. परंतु आरक्षण हे विकासासाठी नव्हे तर ह्या देशात असलेल्या हजारो मागासलेल्या जाती ना प्रतिनिधित्व मिळण्यासाठी आहे .. या जाती एकदुसयावर नियंत्रण ठेऊन; एक नियंत्रित प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यासाठी आरक्षण आहे.

संविधान सन्मान सभेत जमा झालेल्या ५ लाख जनतेच्या माध्यमातून पुढील राजकारणाच्या समिकरणाची गणित ही इंडिया आघाडीतील पक्षा पुढे बाळासाहेबांनी मांडली. आपल्याला संविधान विरोधी शक्ति ना तर नष्ट च करायचे आहे हे स्पष्टपणे बाळासाहेबांनी मांडले सोबतच नवीन येणाऱ्या सत्तेत आपला मानाचा वाटा असला पाहिजे असे उपस्थित जनसमूहाच्या माध्यमातून लक्षात आणून दिले. मागे पुणे येथे झालेल्या दोन विधानसभेच्या पोट निवडणुकीत एक ठिकाणी वंचित आघाडीने उमेदवार दिल आणि दुसरीकडे नाही. जिथे उमेदवार दिला तेथे भाजपा जिंकली आणि उमेदवार नाही दिला तेथे काँग्रेस जिंकली. वंचिताना त्यांचा योग्य वाटा भविष्यात मिळेल का ? हा प्रश्नही ह्या संविधान सभेने उपस्थित केला आहे.

प्रदीप ढोबळे ( अध्यक्ष ओबीसी सेवासंघ )

# भारतीय संविधान आणि नागरिकांची जबाबदारी

आज सर्वत्र २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा होत आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि भारत स्वतंत्र झाला. भारत स्वतंत्र झाला म्हणजे नेमके काय झाले ? तर भारताचा जो भौगोलिक प्रदेश आहे हा प्रदेश म्हणजेच भारताचा भूभाग, भूमी ही भूमी स्वतंत्र झाली. मात्र या भारत देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला जर स्वातंत्र्य कोणी दिले असेल तर ते म्हणजे भारतीय संविधानाने होय. भारताचे संविधान दोन वर्षे अकरा महिने अठरा दिवसांत महापरिश्रमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले. भारताचे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने स्वीकृत केले आणि २६ जानेवारी १९५० रोजी या संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. म्हणून २६ नोव्हेंबर हा आजचा दिवस सर्वत्र 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. कारण भारतातील प्रत्येक नागरिक खऱ्या अर्थाने या दिवशी स्वतंत्र झाला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एक श्रेष्ठ संविधानतज्ञ होते. त्यांनी जगातील अनेक देशांच्या संविधानांचा अतिशय बारकाईने, चिकाटीने अभ्यास केला होता हे करत असताना खूप परिश्रम त्यांना घ्यावे लागले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायदा आणि संविधानाबाबत सूक्ष्म आणि सखोल अभ्यास होता. अप्रतिम आणि अद्वितीय संविधान बाबासाहेबांनी लिहिले होते. म्हणुनच जगातील श्रेष्ठ संविधानामध्ये भारतीय संविधानाचा समावेश होतो. कारण न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही तत्वे भारतीय संविधानाचा पाया आहेत. तसेच समाजातील सर्वच घटकांना विकास आणि प्रगती साध्य करण्याची संधी संविधानाने दिलेली आहे. अलौकिक असे आपल्या भारताचे संविधान बाबासाहेबांनी लिहिले आहे. म्हणुनच कोलंबिया विद्यापीठाने मानद पदवी देऊन त्यांचा उचित गौरव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील एक प्रसंग महत्त्वाचा आहे. बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या अभ्यासाची सुरुवात कशा प्रकारे केली हे या प्रसंगावरून लक्षात येते, भारतातील लोकांना राजकीय अधिकार देण्यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी एक आयोग नियुक्त करण्याची घोषणा इंग्लंडचे प्रधानमंत्री स्टेनले बाल्डविन यांनी केली होती. यानुसार २६ नोव्हेंबर १९२७ साली भारतीय संविधानिक आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाचे अध्यक्ष सर जॉन सायमन होते. म्हणून सदरील आयोगास 'सायमन कमिशन' असे देखील म्हणतात. आयोगाशी विचारविनिमय करण्यासाठी राज्यस्तरावर सात सदस्यांची समिती निश्चित करण्यात आली होती. या सात सदस्यांच्या समितीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५ ऑगस्ट १९२८ साली मुंबई विधिमंडळातून सदस्य म्हणून निवड झाली होती. बाबासाहेबांचा कायद्याचा सखोल असा अभ्यास होता. अर्थशास्त्र, राजकारण, कायदा या वरील वाचन त्यांनी केलेले होते. बाबासाहेबांना त्यावेळी जाणीव झाली की, सायमन कमिशन सोबत विचारविनिमय करताना भारतीय संविधानाचा विषय मोठ्या प्रमाणात चर्चेस येईल अशा वेळी आपण मौन धारण करून जमणार नाही. आयोगासमोर अस्पृश्यांसह देशातील प्रत्येक नागरिकांच्या हिताचे रक्षण करणारी भूमिका मांडणे आवश्यक आहे. तसेच देशाच्या राजकीय अधिकारासाठी आपण भरीव कार्य केले पाहिजे असे बाबासाहेबांना वाटले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रदेश समितीवर निवड झाली त्याच्या दुसऱ्याच दिवशी ६ व ७ ऑगस्टला बाबासाहेबांनी आपल्या काही मित्रांकडून चारशे रुपये उधार घेतले आणि ८ ऑगस्टला तारापूरवाला बुकसेलर्सच्या दुकानातून साडे आठशे रुपयांचे संविधानाशी संबंधित असलेले ग्रंथ विकत घेतले. लगेच ९ ऑगस्टच्या सकाळी आपल्या कार्यालयाच्या खिडक्या आणि दरवाजा बंद करून विकत घेतलेल्या पंधरा–वीस ग्रंथांच्या अभ्यासाला बाबासाहेब बसले. त्यावेळी काही लोक बाबासाहेबांना भेटण्यास येत आणि दरवाजा ठोठावत असत तेंव्हा बाबासाहेब आपल्या त्रासिक मुद्रेने त्यांना परत जायला सांगत असत. काही वेळाने आणखी काही दुसरे लोक भेटायला यायचे ते सुद्धा दरवाजा ठोठावत असत त्यांना देखील बाबासाहेब परत जायला सांगायचे. भेटायला येणार्या लोकांमुळे संविधानाशी संबंधित ग्रंथांचा अभ्यास करण्यामध्ये बाबासाहेबांना अडथळा निर्माण होत होता. ग्रंथाचा अभ्यास करताना लोकांचा अडथळा होऊ नये यासाठी त्यांनी त्यांचे कार्यकर्ते मडकेबुवा यांना सांगितले की, 'मडकेबुवा, दरवाजाला बाहेरून कुलूप लावा. सकाळी, दुपारी आणि सायंकाळी इराण्याकडून मला खिडकीतूनच चहा देण्याची व्यवस्था करा आणि दुपारचे व संध्याकाळचे जेवण देखील खिडकीतूनच द्या' बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे सर्व व्यवस्था मडकेबुवांनी केली तसेच त्यांनी बाबासाहेबांना सांगितले की, 'जर तुम्हाला काही कामासाठी माझी आवश्यकता वाटली तर मला बोलावून घ्या मी कार्यालयाच्या बाहेरच्या बाकावरच झोपून राहतो.' अशाप्रकारे कार्यालयाच्या दरवाजाला बाहेरून अक्षरशः कुलूप लावून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सतत दोन आठवडे कार्यालयातच ग्रंथांचा अभ्यास केला. एकंदर संविधानाच्या अभ्यासाची सुरुवात अशाप्रकारे झाली. तारापूरवाला बुकसेलर्सकडून नंतर देखील नवीन ग्रंथांची खरेदी बाबासाहेबांनी केली.



पुढे या दुकानात ग्रंथ खरेदीची इतकी उधारी झाली की बाबासाहेबांना उधारीचे पैसे परत करण्यासाठी १९३६ मध्ये 'चारमिनार' ही इमारत विकावी लागली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाचा अभ्यास कशा प्रकारे केला हे यावरून दिसून येते. तसेच आजच्या विद्यार्थ्यांनी,अभ्यासकांनी अभ्यास कसा करावा या संदर्भात देखील सदरचा प्रसंग खूप काही शिकवून जातो. भारतीय संविधान लिहीण्यासाठी खूप मोठे बलिदान, खूप मोठा त्याग बाबासाहेबांनी केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे संविधानतज्ञ होते परंतू ते एका दिवसात संविधानतज्ज्ञ बनले नाहीत यासाठी कठोर मेहनत आणि परिश्रम बाबासाहेबांना घ्यावे लागले हे या प्रसंगावरून दिसते.

भारत देशात चातुर्वर्ण्य व्यवस्था हजारो वर्षापासून अस्तित्वात होती ज्याची मुळे विषमतेवर आधारित होती अशा देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यावर आधारित घटना अंगीकारणे म्हणजे एक फार मोठी क्रांतिकारक बाब होती हे सर्व बाबासाहेबांमुळे शक्य झाले. त्याचप्रमाणे भारतातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क आणि अधिकार मिळावेत यासाठी बाबासाहेबांनी अठरा–अठरा तास बसून मिळविलेले ज्ञान, प्रकांड बुद्धिमत्ता, आपले पांडित्य हे सर्वस्व पणाला लावले होते. एकुणच भारतीय संविधान लिहिताना आपल्या विद्वत्तेचा कस बाबासाहेबांनी लावला आणि हजारो वर्षापासून गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या अधिकार वंचित लोकांना संविधानाने मूलभूत हक्क आणि अधिकार बहाल केले. स्त्रियांना, शेतकऱ्यांना, कामगारांना, शोषितांना, पिढीतांना, अस्पृश्यांना हक्क अधिकार देवुन सन्मानाचे जिणे संविधानाने बहाल केले. म्हणूनच आजचा हा दिवस प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी महत्त्वाचा आहे. भारतात अनेक धर्माचे, जातीचे, पंथाचे, वंशाचे, वर्णाचे लोक राहतात या सर्व ज्ञाती समूहांना संविधानात स्थान देणे आणि प्रत्येकाचे हितसंबंध जोपासणे हे खूप जिकिरीचे काम होते हे सर्व काम यशस्वीपणे बाबासाहेबांनी केले आहे. हे करत असताना त्यांची विद्वत्ता वेळोवेळी कामी आली आहे. संविधानाची सुरूवात करताना देखील अनेक मत मतांतरे झाली पण बाबासाहेब 'लोक' या शब्दापासून भारतीय संविधानाची सुरूवात होईल या आपल्या मतावर ठाम होते आणि शेवटी 'आम्ही भारताचे लोक...'(वूई द पिपल ऑफ इंडिया) अशीच संविधानाची सुरूवात झाली. कारण भारतातील लोक हेच भारतीय संविधानाचा केंद्रबिंदू आहेत. लोकांच्या हितासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी हे संविधान आहे म्हणुन बाबासाहेब 'लोक' या शब्दाने संविधानाची सुरूवात करण्यात यशस्वी झाले. हे सर्व कार्य संविधानाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे या त्यांच्या कार्याला जगात तोड नाही असे अजोड कार्य त्यांनी केले आहे.

दक्षिण आफ्रिकेतील सर्वसामान्यांना मताचा अधिकार मिळावा यासाठी नेल्सन मंडेला यांना तीस वर्ष तुरुंगवास भोगावा लागला तो मताधिकार भारतीयांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जन्मताच बहाल केला आहे यासह असे कितीतरी महत्वपूर्ण हक्क आणि अधिकार आहेत जे की भारतातील प्रत्येक नागरिकाला बाबासाहेबांनी दिलेले आहेत. जगात अनेक लोकशाही राष्ट्रे आहेत पण भारतासारखी लोकशाही आणि भारतासारखे संविधान जगात कोठेच नाही हे जगाने मान्य केले आहे. जगात एवढा मोठा सन्मान भारताला व भारतीयांना संविधानामुळे मिळाला आहे. मसुदा तयार करत असताना संविधान सभेने दिलेली जबाबदारी बाबासाहेबांनी विश्वासार्हपणे आणि यशस्वीतर्हेने पार पाडली म्हणुनच बाबासाहेबांना घटनेचे शिल्पकार ही बिरुदावली यथार्थ शोभून दिसते. म्हणून घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानावरच हा देश पुढे जाईल यात तिळमात्र शंका नाही. तसेच संविधानाच्या माध्यमातूनच धर्म, वंश, लिंगभेद, जातीभेद, भाषाभेद या भेदाभेदांच्या चक्रव्यूहातून आपण सर्वजण बाहेर पडू शकतो हा विचार भारतातील प्रत्येक नागरिकांच्या मनात बिंबविणे शक्य झाले तरच न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या महान अशा मूल्यांवर आधारित सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविणे शक्य होईल. यासाठी भारतातील प्रत्येक नागरिकाने संविधानाबाबत जागृत असणे गरजेचे आहे.

भारतातील प्रत्येक नागरिक संविधानासमोर समान आहे. प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहीत असताना मनामध्ये कसलाही आकस न ठेवता संविधान लिहिले आहे म्हणूनच ते म्हणतात की, 'मी प्रथम भारतीय आहे आणि नंतरही भारतीयच आहे' अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राहिलेली आहे. मोठ्या परिश्रमाने हे संविधान लिहिले गेलेले आहे. आज घडीला भारतीय नागरिकांवर संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे. तसेच लोकांमध्ये संविधानाविषयी जाणीव जागृती होणे सुद्धा आवश्यक आहे. प्रत्येक घराघरांमध्ये 'संविधान' असणे काळाची गरज आहे. आजच्या तरुण पिढीने सुद्धा भारतीय संविधानाचे महत्त्व ओळखून संविधानाचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानात मूलभूत हक्क, अधिकार आणि जबाबदाऱ्या सांगण्यात आलेल्या आहेत त्या प्रत्येकांचे रक्षण करण्याचे दायित्व भारतीय नागरिकांचे आहे. संविधानाप्रति असणारी आपली जबाबदारी भारतीय नागरिकांनी वेळीच ओळखली पाहिजे. आपल्याला मिळालेले हक्क, अधिकार सहजासहजी मिळालेली नाहीत ते टिकावेत यासाठी संविधानाचे रक्षण आवश्यक आहे. देशामध्ये अनेक वाईट प्रवृत्ती असतात मागे दिल्ली येथे जंतर मंतर मैदानावर काही मनुवाद्यांनी भारतीय संविधान जाळले ही खूप मोठी शोकांतिका आहे. भारतात राहायचे आणि भारतीय संविधानाचा अवमान करायचा हे काही सद्सद्विवेक बुद्धिला पटणारे नाही. म्हणुन अशा मनुवाद्यांवरती राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करून यांना कठोरात कठोर शासन करणे गरजेचे आहे. जेणे करून पुन्हा कोणाचीही भारतीय संविधानाचा अवमान करण्याची हिंमत होता कामा नये. वर्तमान परिस्थितीतीत हा सर्व विचार प्रस्थापित शासन व्यवस्थेने, नागरीकांनी करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरून संविधानाचे रक्षण होईल. देशात आज संविधान दिन मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा होत आहे. शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयांमध्ये संविधान दिन साजरा होत आहे. हा संविधान दिन साजरा करत असताना, आपला भारत देश आहे आणि भारतीय संविधान हे आपले आहे ही भावना प्रत्येक भारतीयांच्या मनात रुजणे काळाची गरज आहे. तसेच आजच्या दिनी भारतीय संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकांनी घेवून घटनेचे शिल्पकार संविधानकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करावी. आपण सर्व भारतीय नागरिक संविधानाविषयी जागृत राहून संविधान रक्षणाची आपली जबाबदारी ओळखून घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त कराल या अपेक्षेसह सर्व भारतीयांना संविधान दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. भारतीय संविधान चिरायू होवो.

*************

!प्रा. महेंद्र शकुंतला अच्युतराव आल्टे
मुरुड, ता. जि. लातूर
भ्र. ९७६६५६५६८३

# महात्मा फुले क्रांतिकारी विचारांचे प्रेरणास्त्रोत आणि सनातनी भटा ब्राम्हणांचे कर्दनकाळ

भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांना असंघटीत कामगारांना संघटित करण्याची प्रेरणा देणारे आणि भारतात महिलांना शिक्षण घेण्यासाठी स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई यांना शिक्षण घेण्यास सतत प्रेरणा देणारे ज्योतीराव गोविंदराव फुले म्हणजे महात्मा ज्योतीराव फुले,ग्रामीण भागात आजही जोतीराव ज्योतीराव नाही तर ज्योतिबाच म्हटल्या जाते. भटा ब्राम्हणांनी मराठा मागासवर्गीय समाजात एक म्हण पेरून ठेवली आहे.ती म्हणजे हाले डुले महात्मा फुले माथाडी कामगारात विशेष कोल्हापूर,सांगली,सातारा, पुणे,नगर जिल्ह्यातील कामगार मंडळी या म्हणीचा जास्त शब्द प्रयोग करतात. महात्मा फुले क्रांतिकारी विचारांचे प्रेरणास्त्रोत आणि सनातनी भटा ब्राम्हणांचे कर्दनकाळ होते हे त्यांना महात्मा फुले यांचा ऐतिहासिक इतिहास जास्त माहीत नाही.म्हणूनच ते असे म्हणतात.

जोतीराव गोविंदराव फुले (जन्म ११ एप्रिल १८२७ – मृत्यू २८ नोव्हेंबर १८९०), महात्मा फुले नावाने लोकप्रिय होते. क्रांतिकारी विचारांचे सामाजिक कार्यकर्ते,थोरविचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि सिद्धास्त लेखक होते.जातिव्यवस्थेचे निर्मूलन,स्त्रियांना आणि मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्यासाठी संघर्ष करणारे नेते होते.त्यांनी अनेक क्षेत्रांमध्ये संघर्ष करून ऐतिहासिक कार्य निर्माण करून ठेवले आहे.त्यांना जाऊन २८ नोव्हेबर २०२३ ला १३३ वर्ष पूर्ण होणार आहेत.तरी ही स्त्री पुरुषातील शिक्षण,आचरण, संस्कार,कर्तव्य आणि जबाबदारीतील विषमता पाहून त्यांची आठवण झाल्या शिवाय राहत नाही. ज्यांनी सावित्रीबाई व ज्योतिबा फुले यांचा जीवन संघर्ष वाचला त्यांनाच त्यांची आठवण येते.ज्यांनी ते वाचले नाही त्यांना काहीच फरक पडत नाही.कोणता ही महापुरूष हा त्या काळाच्या मर्यादांनी वेढलेला असतो. फुले द्रष्टे,योद्धा आणि समाजक्रांतिकारक होते. विषमता,असमानता अन्याय अत्याचाराच्या विरोधात नेहमी लढणारा माणूस त्यावेळी सनातनी भटा ब्राम्हणांच्या हिट लिस्टवर होता. त्यामुळे त्यांना जागोजागी संकटाचा सामना करावा लागे.यावर त्यांनी बुद्धीचातुर्याने मात केली.आजच्या सारखी जीवघेणी नीतिमत्ता नसलेले हिंसाचारी लोक तेव्हा नव्हते,असे म्हटले तर चूक ठरणार नाही.त्यावेळची परिस्थीती आम्ही वाचली आहे. पण आज लोकशाही असूनही प्रशासकीय व्यवस्थेतील मनुवादी किती हिंसक प्रवृतीचे आहेत.हे मागासवर्गीय समाजाच्या तरुणांना कशी वागणूक देतात.ते सोशल मीडियावर पाहिल्यावर अंगावर काटा उभा राहतो. मग ज्योतीराव फुले यांनी सावित्रीबाईला शिक्षण देऊन मुलीची शाळा काढून किती मोठा संघर्ष केला असेल यांची कल्पनाच केल्या जात नाही. आजच्या जागतिकीकरणाच्या संघर्षशील जिवनात असे काही महापुरुष,महात्मे शोधून ही सापडणार नाहीत. काही शिक्षण सम्राट आहेत पण त्यांच्या कडून कोणताही आदर्श घेण्याच्या लायकीचे ते नाहीत.

महात्मा फुले क्रांतिकारी विचारांचे प्रेरणास्त्रोत आणि सनातनी भटा ब्राम्हणांचे कर्दनकाळ होते. त्याच बरोबर उद्योगपती आणि कार्यकारी संचालक जोतीराव फुले खूप लोकांना माहिती नाहीत. जोतीरावांच्या कंपनीनं केलेली महत्त्वाची कामं म्हणजे कात्रजचा बोगदा,येरवड्याचा पूल आणि खडकवासला धरणाचा कालवा होय. जोतीरावांच्या उद्योगपती,कार्यकारी संचालक,अर्थतज्ज्ञ आणि शेअर मार्केटविषयक योगदानाकडे जाणकारांचं अद्याप पुरेसं लक्ष गेलेलं नाही. ख्यातनाम विचारवंत डॉ.रामचंद्र गुहा यांनी जोतीरावांना आधुनिक भारताचे शिल्पकार मानलेले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांना गुरूस्थानी मानायचे आणि फुले यांचा वारसा आपण कायम उराशी बाळगू असे अभिमानानं सांगायचे. १९३२ साली पुण्यात बोलताना महात्मा गांधी म्हणाले होते, जोतीराव फुले देशके पहले महात्मा थे. असली महात्मा वोही थे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी फुल्यांना समाज क्रांतिकारक म्हणून गौरविले होते. तीन अगदी भिन्न वैचारिक छावण्यांमधील या नेत्यांनी फुल्यांचा गौरव केलेला आहे.त्याच बरोबर ज्योतीराव फुले उत्तम बिल्डर उद्योगपती आणि कार्यकारी संचालक होते हे आम्ही कधी वाचलेच नव्हते.पण हरी नरके सारख्या बुद्धिजीवी विचारवंतांनी त्यांच्या या ऐतिहासिक कार्याचा अभ्यास करून जगा समोर मांडला परंतु त्यावर व्यापक चर्चा होतांना दिसली नाही. ज्योतीराव फुले यांच्या कंपनीनं केलेली महत्त्वाची कामे वस्तु आजही लक्षवेधी आहेत पण त्यांची पाहिजे त्या प्रकारे दाखल घेतल्या जात नाही.कात्रजचा बोगदा,येरवड्याचा पूल आणि खडकवासला धरणाचा कालवा कोणी बांधला?. कधी बांधला ?.या बाबत कोणी विचारत नाही.कारण या वर चर्चा सुरू झाल्यास आजच्या तरुणांना एक प्रेरणादायी सत्य इतिहास समोर येईल या भीतीने त्यावर चर्चाच होत नाही.म्हणूनच महात्मा फुले क्रांतिकारी विचारांचे प्रेरणास्त्रोत आणि सनातनी भटा ब्राम्हणांचे कर्दनकाळ होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्योतीराव फुलेंना गुरुस्थानी मानायचेच अनेकांना आज भी काळजाला झोबंते.त्यामुळे बाबासाहेब फुलेनां गुरूस्थानी मानायचे आणि फुले यांचा वारसा आपण कायम उराशी बाळगू असे अभिमानानं सांगायचे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारा समाज आज ही फुलेंच्या विचारांशी प्रामाणिक राहुन उठता बसता त्यांच्या विचारला प्रतिमांना त्रिवार प्रणाम करतो.बाकी माळी ओबीसी समाजाच्या घरात महात्मा फुले सावित्रीबाई फुलेचा फोटो दिसणार नाही.आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांचे घरा घरातच नव्हे तर प्रत्येक शुभ कार्याला पत्रिकेवर महात्मा फुले,सावित्रीबाई फुले,राजर्षी शाहू महाराज बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो असतात. आज देशात मूह मे राम बगल मे सूरी या रीतीने गांधीवादी,सावरकरवादी आणि मनुवादी वागतांना दिसतात. ज्योतीरावांनी सर्वांना शिक्षण,ज्ञाननिर्मिती,कौशल्य निर्मिती,स्त्री–पुरुष समता,जातीनिर्मुलन,संसाधनांचे फेरवाटप,धर्मचिकित्सा आणि आंतरजातीय विवाह या कार्यक्रम पत्रिकेच्या आधारे आधुनिक भारताच्या पायाभरणीचे ऐतिहासिक काम करून ठेवले म्हणून आज त्यांची फळ आपण मुक्तपणे खातो.म्हणूनच महात्मा फुले क्रांतिकारी विचारांचे प्रेरणास्त्रोत आणि सनातनी भटा ब्राम्हणांचे कर्दनकाळ होते. जोतीराव आयुष्यभर विनावेतन आणि विना मानधन पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ते राहिले.त्यांनी स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून समाजकार्य केलं. ते 'पुणे कमर्शियल आणि कॉट्रॅक्टींग कंपनी'चे झ्रींपश लोशीलळरश्र लेपींीरलींळपस ेारपू कार्यकारी संचालक होते. एक अव्वल दर्जाचे यशस्वी उद्योगपती, व्यापारी आणि नामवंत



शेतकरी म्हणून जोतिरावांचा नावलौकिक होता. या कंपनीने धरणं, कालवे,बोगदे,पूल,इमारती,कापडगिरण्या,राजवाडे, रस्ते आदींची भव्य आणि देखणी बांधकामं केली. जोतीरावांच्या उद्योगपती,कार्यकारी संचालक,अर्थतज्ज्ञ आणि शेअर मार्केटविषयक योगदानाकडे जाणकारांचं अद्याप पुरेसं लक्ष गेलेलं नाही. जोतीराव हे स्वत:च्या तेलानं जळणारे सामाजिक कार्यकर्ते होते. वर्गणीवर समाजकार्य करण्याची प्रथा तोवर निर्माण झालेली नव्हती. स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून त्यांनी समाजकार्य केले. 'बिल्डर' हा शब्द आज वेगळ्या अर्थानं प्रचलित झालेला आहे. त्याला 'आदर्श' रूप प्राप्त झाल्यानं तो वापरताना काळजी घ्यावी लागते. जोतीराव हे मूलत: एक 'नेशन बिल्डर' होते. त्यांच्या कंपनीचे भागीदार असलेले वा सत्यशोधक समाजाचे सदस्य असलेले अनेक मान्यवर बांधकाम क्षेत्रावर आपली मोहर उमटवून गेले आहेत. मुंबई महानगरपालिकेची मुख्य इमारत, भायखळा पूल आणि परळचे रेल्वे वर्कशॉप,मुंबईतील अनेक कापडगिरण्या,भंडारदरा जलाशय,बडोद्याचा सयाजीराव गायकवाडांचा लक्ष्मीविलास राजवाडा,आदींची बांधकामे सत्यशोधकांनी केलेली आहेत. राजू बाबाजी वंजारी यांनी मुंबईतील टाइम्स ऑफ इंडियाची इमारत,सोलापूरची लक्ष्मी विष्णू मिल आणि लक्ष्मीदास खिमजी यांच्या मुंबईतील कापड गिरण्या बांधल्या. हे सर्वजण जोतीरावांचे निकटचे स्नेही आणि जोतीरावांच्या कंपनीचे भागीदारही होते. त्यांनी सत्यशोधक चळवळीला फार मोठे योगदान दिलेलं आहे

महात्मा फुले यांच्या क्रांतिकारी विचाराचा वारसा आंबेडकरी चळवळ पुढे नेत आहे त्याला मागासवर्गीय समाजाने खऱ्या अर्थाने साथ दिल्यास केंद्रात फुले शाहु आंबेडकर विचारांचे सरकार स्थापन होऊ शकते.मान्यवर कांशीरामजी यांनी उत्तर भारतात या महापुरुषांच्या क्रांतिकारी विचारांची पेरणी करून ठेवली आहे. पण काही मागासवर्गीय समाजातील गुलामांनी त्याला सुरुंग लावला होता.शत्रू पक्षाच्या विचारधारेच्या नेत्यांना केवळ आर्थिक लाभा करीता संघटनेत सहभागी करून घेतल्यामुळे क्रांतिकारी विचारांचे कॅडर बेस संघटन मागे पडले आणि लीडर बेस लोक पुढे आले त्यामुळे पक्ष संघटनेवर परिणाम झाला.त्यांचे फळ आज उत्तर भारतीय जनता भोगत आहे.व्यक्ती पेक्षा संघटन मोठे असते संघटने पेक्षा विचारधारा मोठी असते.फुले शाहु आंबेडकर विचार हे सर्वांन पेक्षा मोठे आहेत. क्रांतिकारी विचारांचे प्रेरणास्त्रोत महात्मा फुले आहेत.त्यांची विचारांची अंमलबजावणी व्यवस्थित झाली तर क्रांतिकारी परिवर्तन घडल्या शिवाय राहणार नाही.आज देशात जी परिस्थिती आहे.तिचा गांभीर्याने विचार करण्यासाठी महापुरुषांची क्रांतिकारी विचारधाराच यातुन बाहेर पडण्याचा मार्ग दाखवु शकते. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या १३२ व्या स्मृतिदिना निमित्त सर्व मागासवर्गीय समाजाने आपआपल्या समाजाच्या संघटनेचे वैचारिक आत्मचिंतन करून परीक्षण करणे आवश्यक आहे.आपण कामगार, कर्मचारी अधिकारी,विद्यार्थी, शिक्षक,प्राध्यापक,वकील,इंजिनियर, डॉक्टर,व्यवस्थापक,पत्रकार,साहित्यिक,संपादक आणि शेतकरी शेतमजूर व्यापारी म्हणून कोणत्या विचारधारेच्या पक्ष संघटना,संस्था,संघटना ट्रेड युनियनचे साधे सभासद आणि किर्याशील सभासद आहात.यांचे छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले,राजर्षी शाहूमहाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक गुरु शिष्याच्या नात्याचा आपल्या डोळ्या समोर कोणता आदर्श आहे. गुरु शिष्याच्या महात्मा ज्योतीराव फुले यांच्या १३३ व्या स्मृतिदिना निमित्त त्यांचे आत्मचिंतन आणि परीक्षण करावे असे जाहीर आवाहन करीत आहे.महात्मा फुले क्रांतिकारी विचारांचे प्रेरणास्त्रोत आणि सनातनी भटा ब्राम्हणांचे कर्दनकाळ होते.अशा क्रांतिकारी समाज परिवर्तन करणाऱ्या महात्मांच्या विचारांना व प्रतिमेला कोटी कोटी प्रणाम.

******************

सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई,
अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना,स्वतंत्र मजदूर युनियन
महाराष्ट्र राज्य.

# चातुर्वर्णीय भेदभावास विरोधकर्ते!

महात्मा जोतीराव फुले स्मृती सप्ताह विशेष.


क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांची इतर नावे महात्मा फुले, ज्योतिबा फुले, आबा, राष्ट्रपितामह, तात्यासाहेब, शिक्षणसम्राट आदी आहेत. ते मराठी लेखक, कवी, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली; शेतकरी, कामगार, अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची पेरणी केली. तसेच त्यांनी महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या पुण्यस्मरणाच्या पावन पर्वावर त्यांचे ऋणनिर्देश करणारा अलककार– श्री कृष्णकुमार लक्ष्मी–गोविंदा निकोडे यांचा हा लेख अभ्यासा... संपादक.

स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यात जन्म सार्थक मानतात, परंतु शेतकरी वगैरेंना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे, असा महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा बोध केला. त्यातील काही वचने आपण वाचली की लक्षात येते, की त्यांचा आवाका किती मोठ्ठा होता? त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही भारतात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत होते. वेदाने समाजात भेद पडले. म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहुतून जन्मले, शूद्र त्याच्या पायातून निघाले हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्य वाटे. मनुस्मृती ही शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला. भ.बुद्धाविषयी जोतिरावांना नितांत आदर वाटे.

शेतकऱ्यांचे आसूड हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया त्यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या बीजमंत्राने बहुजन समाज खडबडून जागा झाला. त्यांचे ते शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे मंत्र– ओळी सर्वांना तोंडपाठ झाल्या आहेत–

विद्येविनामतीगेली।मतीविनानीतीगेली।नीतीविनागतीगेली।गतीविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

जोतिबा फुलेजींचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे



होते. त्याच गावी त्यांचा जन्म दि. ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुलेजींचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. तेच नाव पुढे रूढ झाले. जोतीरावजी केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीमाईंशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स.१८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच–सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. ग्रामची या प्रसिद्ध तत्ववेत्त्याने महात्मा फुले यांना सेंद्रिय बुद्धिवंत असे संबोधले आहे. जोतिराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रिय व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. पुढे महात्मा फुलेजींनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी तद्वतच अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केली. त्यांना स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण– सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढली. तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी– क्रांतिज्योती सावित्रीमाईंवर सोपविली. त्यांच्या सोबतीला ज्ञानज्योती फातिमाबी शेख सावलीसारख्या होत्या. यानंतर जोतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या.

त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतिबांकडून रोज संतश्रेष्ठ कबीरांचा बीजमती हा ग्रंथ वाचून घेत असत. त्यामुळे त्यांच्या मनावर संत विचारांची शिकवण चांगलीच बिंबली. अनेक दोहे त्यांना पाठ झाले. त्यातील एक–

नाना वर्ण एक गाय, एक रंग है दूध! तुम कैसे बम्मन, हम कैसे क्षूद!!

कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे, असे रोखठोकपणे बोलत. मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी गुप्तशक्ती आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे, असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे, हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी आदी ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल? त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे? हे जोतीराव फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडले आहे–

धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्यानें वर्तावें। ईशासाठीं।। सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों। मनुजा सांगतो। जोती म्हणें।। (महात्मा फुले समग्र वाङ्मय: सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक: अखंड– पृ.क्र.५५९.)

बहुजन समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील मुलांपर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. वेदांना झुगारून जोतिबांनी हे कार्य करण्यास सुरवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरूवात केली. तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीमाई फुले यांनी केले. त्यांच्याबरोबर १९ स्त्रिया सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी त्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. त्यानंतर मुख्याध्यापिकाही झाल्या. छ.शाहू महाराजांनी या सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला होता. न्याय, अत्याचार व गुलामगिरी यांपासून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. या समाजाने पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. तेही स्वरचित मंगळाष्टके उच्चारून–

देवाचे नियमां प्रमाण धरुनी, चालें तुझें कूळ गे।। सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच हे त्वत्सगे।। अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी।। प्रीतीनें वरितों तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी।। .... शुभमंगल सावधान।।१।। (महात्मा फुले समग्र वाङ्मय: सत्यशोधक समाजोक्त पूजा–विधी: मंगळाष्टक– वर: पृ.क्र.४३४.)

जोतिबा फुलेजींना मुंबईच्या जनतेनेच महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स.१८८८ साली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले–शाहू–आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी आपल्या अनुयायांसह सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यात सर्व जाती धर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन उत्पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले. तर–

सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।।

हे या समाजाचे घोषवाक्य होते.

सर्वसामान्यांचे कैवारी शिक्षणसम्राट महात्मा जोतीरावजी फुले हे दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे निर्मिकांकी कायमचे विसावले. आज सर्वत्र त्यांचा पावन स्मृतिदिन खरा शिक्षकदिन मानून बहुजन समाजातर्फे गावोगावी आठवडाभर विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. तो आता शासन दरबारीही लागू होण्याची प्रतिक्षा आहे, हे येथे उल्लेखनीयच! !! पावन स्मृतिनिमित्त त्यांच्या चरणकमली या लेकरांचे कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

****************************

– जोतिबांचा लेकरू –
सत्यशोधक– श्री कृष्णकुमार लक्ष्मी–गोविंदा निकोडे.
मु. पिसेवडधा, पो. देलनवाडी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

# अनेक संस्थांनाचे संस्थापक नवी मुंबईतील ज्येष्ठ समाजसेवक मच्छिन्द्रनाथ म्हात्रे यांचे दुःखद निधन

नवी मुंबई/के.रवि(दादा):- नवी मुंबईतील घणसोलीचे संस्थापक अध्यक्ष तसेच घणसोली गावाच्या जडण घडणीत लक्षणीय योगदान देणारे ज्येष्ठ समाजसेवक मच्छिन्द्रनाथ लक्ष्मण म्हात्रे (वय -८४)यांचे अल्पशा आजाराने हल्लीच निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी,चार मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे, असा मोठा परिवार आहे.

मछिंद्रनाथ म्हात्रे यांनी त्यांच्या सुरुवातीच्या काळात पंचवीस वर्षे ग्रामपंचायतीचे सदस्य तसेच पाच वर्षे उपसरपंच म्हणून काम पाहिले. नवी मुंबईतील शेतकरी शिक्षण संस्थेचे ते संस्थापक कार्यकारी सदस्य तसेच माजी उपाध्यक्ष आहेत.तसेच घणसोली गावातील वैभव पतपेढी, औद्योगिक सहकारी सोसायटी, ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था,भाईंदर


कै. मच्छिंद्रनाथ लक्ष्मण म्हात्रे
मृत्यू : कार्तिक शु१०, शके १९४५, बुधवार दि. २२ नोव्हें. २०२३

रेशनिंग सेवाभावी संस्था, म्हात्रे कुलदैवत सेवाभावी संस्था अशा अनेक संस्थांचे ते संस्थापक व अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत होते.ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना तांत्रिक शिक्षणासाठी एमआयडीसी बरोबर सातत्याने पाठपुरावा करून औद्योगीक संस्था काढण्यास भाग पाडले.त्यांच्या संस्कारिक कार्यामुळे नवी मुंबईत उच्चविद्याविभुषीत पिढी निर्माण झाली आहे. त्यांचे ज्येष्ठ सुपुत्र घनश्याम म्हात्रे हे सुप्रिम कोर्ट व हायकोर्ट व मॅनेजमेंट कन्सल्टंट आहेत. त्यांची एक नात नुरो सर्जन व इतर नातवांनी एम टेक, बी टेक, इंजिनियर व मॅनेजमेन्ट केलेले आहे.दिवंगत मच्छिन्द्रनाथ यांच्या अंत्ययात्रेत आमदार रमेशदादा पाटील तसेच विविधक्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. मच्छिन्द्रनाथ म्हात्रे यांची शोकसभा घणसोलीमधील ज्येष्ठ नागरीक सेवा संस्थेच्या वतीने मंगळवार दिनांक २८नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता सनशाईन हाईट्स को. ऑप.हौ. ली.तळमजला, पामबीच रोड,येथे आयोजीत करण्यात आली आहे

# लातूर महिला मोर्चाचा पुणे येथे सन्मान. सेल्फी विथ माटी उपक्रमात महिला मोर्चा आला होता राज्यात प्रथम.

लातूर : - स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या सांगतेवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मेरी माटी मेरा देश' या संकल्पाला बळ देण्यासाठी राज्याचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सेल्फी विथ माटी हा उपक्रम सबंध राज्यात राबविण्यात आला होता.याद्वारे घरातील मातीसोबतच राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या सेल्फीचे संकलन करण्यात आले.महाराष्ट्राच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने ही घेतली. त्याबद्दल हा विक्रम ज्यांच्यामुळे झाला त्यांचा सन्मान रविवारी करण्यात आला.भाजपच्या प्रत्येक आघाडीने हे उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवले होते.ज्यात भाजप महिला मोर्चा आघाडीने हे उपक्रम राज्यात राबवताना सर्वाधिक सेल्फी विथ



माटी घेण्याचा मान लातूर महिला मोर्चाला मिळाला होता.याबद्दल पुणे येथे रविवारी महिला मोर्चाचा गौरव करण्यात आला.लातूर शहर महिला मोर्चाच्या अध्यक्षा रागिणी यादव यांनी हा गौरव स्वीकारला. सेल्फी विथ माटी या उपक्रमात उल्लेखनीय कार्य केलेल्या सर्व मंडळींचा गौरव पुणे येथे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील,पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.यावेळी लातूर महिला मोर्चाचा देखील सन्मान करण्यात आला.१६ ते ३० ऑक्टोबर या दरम्यान हे उपक्रम राज्यात राबवण्यात आले होते.ज्यात लातूर महिला मोर्चाच्या अध्यक्ष रागिणी यादव यांच्या नेतृत्वाखाली महिला मोर्चाने १७५०० सेल्फी घेत राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला होता.काल पुणे येथे महिला मोर्चाच्या कार्याची दखल घेऊन सन्मानित केल्याने महिला मोर्चाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चिपळूण तालुकास्तरीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत एस.पी.एम. इंग्लिश मीडियम स्कूल परशुराम प्रथम क्रमांक

चिपळूण / ( विलास गुरव) रत्नागिरी जिल्हा गणित अध्यापक मंडळ आणि चिपळूण तालुका गणित अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने युनायटेड इंग्लिश स्कूल चिपळूण येथे तालुकास्तरीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेसाठी चिपळूण तालुक्यातील २८ संघ सहभागी झाले होते. त्यामधून अत्यंत चुरशीच्या स्पर्धेमध्ये एस.पी.एम. इंग्लिश मीडियम स्कूलच्या अपूर्व आनंद बुरटे आणि शार्दुल तुषार शिंदे या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला व त्यांची जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषेसाठी निवड झाली. सदर स्पर्धेत गद्रे इंग्लिश मीडियम स्कूलच्या ऋषिकेश मंदार लेले आणि चैतन्य मिलिंद साल्ये यांनी द्वितीय क्रमांक आणि मेरी माता इंग्लिश मीडियम स्कूल खेर्डीच्या आर्या अभिजीत बर्वे आणि आदित्य सचिन राजेशिर्के यांनी तृतीय क्रमांक मिळविला. त्याचप्रमाणे देवखेरकी हायस्कूलच्या ऋग्वेद मंगेश अलीम आणि सुजल सुरेश हळदे आणि मोरेश्वर आत्माराम आगवेकर माध्यमिक विद्यालय अलोरेच्या सई संजय बेर्डे आणि भूमि नितीन कोलगे या विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. या



स्पर्धेच्या शानदार पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी चिपळूणच्या किंगमेकर ग्रुपचे आधारस्तंभ, नव कोकण एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान संचालक आणि चिपळूण अर्बन बँकेचे माजी व्हॉइस चेअरमन डॉक्टर दीपक विखारे तसेच उद्योजक श्री. अमजद मुकादम आणि युनायटेड इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. पाटील मॅडम पर्यवेक्षक श्री. मुंडेकर सर, गद्रे इंग्लिश मीडियम स्कूलच्या पर्यवेक्षिका येसादे मॅडम, पाध्ये मॅडम आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. चिपळूण तालुका गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष बिराप्पा मोटगी, उपाध्यक्ष राजेंद्र जाधव ज्ञानेश्वर नाझरे किशोर कित्तूर सर्व कार्यकारणी सदस्य आणि गणित शिक्षक यांच्या उपस्थितीत प्रमुख मान्यवर आणि विद्यार्थी यांना सन्मानित करण्यात आले. सुरुवातीला संपूर्ण स्पर्धे तील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. त्यानंतर गुणानुक्रमे ५ विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन त्यांचाही सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी किंग मेकर ग्रुप चिपळूण यांनी प्रायोजकत्व दिले होते. सदर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन रत्नागिरी जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे उपाध्यक्ष अमोल टाकळे यांनी केले. तसेच जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल चिपळूण तालुका गणित अध्यापक मंडळाचे विशेष अभिनंदन केले आणि स्पर्धेला प्रायोजकत्व देणाऱ्या किंगमेकर ग्रुपचेही विशेष आभार मानले.

# काही गोष्टी प्रवीण तरडेंच्या मनाविरुद्ध केल्या पण... धर्मवीर २ च्या मुहूर्ताला मुख्यमंत्र्यांचा खुलासा

धर्मवीर २ चा मुहूर्त सोहळा आज ठाण्यात कोलशेत येथे संपन्न झाला. या मुहूर्त सोहळ्याला सिनेमातले कलाकार आणि तंत्रज्ञ उपस्थित होते. या सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सुद्धा विशेष उपस्थिती दर्शवली.मुख्यमंत्र्यांनी सर्वांसमोर त्यांचं मनोगत व्यक्त केलं. राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांनी मुहूर्ताचा क्लॅप दिला. त्यावेळी त्यांनी पहिल्या भागात प्रवीण तरडेंच्या मनाविरुद्ध काही गोष्टी घडल्या, असा खुलासा केला.प्रवीण तरडेंच्या मनाविरुद्ध काही गोष्टी घडल्या: मुख्यमंत्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मला अनेक लोकं विचारतात पिक्चर हिंदी मे बनाओ. हा सिनेमा हिंदीमध्ये पाहिजे आपल्याला. काही लोकांना हा सिनेमा खटकला. काही लोकं सिनेमा बघता बघता उठून गेले. काही लोकांना काही सीन आवडले नाहीत. कोणाला आवडो न आवडो आता फायनल ऑथोरीटी मी आहे.धर्मवीरचा पहिला भाग बनवताना काही गोष्टी प्रवीणच्या मनाविरुद्ध झाल्या. आता कलाकार लोकं सर्कीट असतात. सर्कीट म्हणजे वेडे असतात. मग गोड बोलून बोलून त्यांच्या मागे लागावं लागतं.मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, दिघे साहेबांवर सिनेमा करण्याचा उत्साह त्यांनी दाखवला. सिनेमाची सुरुवात तर झाली. त्यांचं कार्य प्रचंड आहे. तर ते किती भागात दाखवता येईल हे मला सांगता येत नाही.



# भारतीय संविधान हाच आदिवासींच्या उत्कर्षाचा महाप्रबंध -प्रशांत वंजारे कोलाम समाजाच्या वतीने संविधान दिनाचे आयोजन

यवतमाळ ( प्रतिनिधी) जगभरातील आदिवासींचा अस्तित्वासाठी संघर्ष सुरू असतांना भारतीय आदिवासींना मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून विशेषाधिकार बहाल केले. आज सर्वच क्षेत्रात आदिवासी समूहाने जी नेत्रदीपक प्रगती केली आहे त्याचे सर्व श्रेय हे फक्त भारतीय संविधानाला आहे. त्यामुळे भारतीय संविधान हाच आदिवासींच्या उत्कर्षाचा महाप्रबंध असल्याचे प्रतिपादन प्रशांत वंजारे यांनी केले. मेडिकल चौकातील सिलेब्रेशन हॉलमध्ये शामादादा कोलाम जयंतीचे औचित्य साधून संविधान दिन आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. प्रशांत वंजारे म्हणाले, देश आज कठीण परिस्थितीतून जात आहे. सर्वच माणसांच्या





जगण्याचे प्रश्न गंभीर बनले आहेत. संविधानाला हात न लावता संविधान मोडीत काढण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात आहेत. संविधानाने बहाल केलेले मूलभूत अधिकार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे समकाळातील आपला लढा हा केवळ जल, जंगल, जमिनीसाठी नसून देश वाचवण्यासाठी असला पाहिजे आणि आदिवासींनी या लढ्याचे नेतृत्व केले पाहिजे. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाचे अप्पर आयुक्त सुरेश वानखडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते त्यांनी कोलाम समाजासाठी असणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती कोलाम बांधवांना दिली आणि शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. बाळासाहेब मांगुळकर, पंडित दिघाडे यांनी सुद्धा समयोचित भाषणे केलीत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक शैलेश गाडेकर यांनी केले तर संचालन मनोज राजूरकर आणि आभार अजय जांभूळकर यांनी मानले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आदिवासी कोलाम संघटनेचे सुभाष कासार हे होते. कार्यक्रमाला यवतमाळ जिल्ह्यातील कोलाम समाजाची लक्षणीय उपस्थिती होती. यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मण आसोले,गजानन येलेकर, मनोज राजूरकर,अजय जांभूळकर यांनी प्रयत्न केले.

# ठाकरे गटाचे जानेवारीत राज्यव्यापी शिबीर

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने जोरदार तयारी सुरु केली आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाच्या संघटनात्मक बांधणीसाठी आता नवी रचना, शिवसेना ठाकरे गटाचे विभागीय नेते जाहीर करण्यात आले आहेत. त्याचबरोबर जानेवारी महिन्यामध्ये ठाकरे गटाकडून राज्यव्यापी शिबिर घेतले जाणार आहे. तसेच जानेवारी महिन्यात उद्धव ठाकरे महाराष्ट्र दौरा करणार आहे.संघटनात्मक बांधणीसाठी ठाकरे गटाची नवी रचना जाहीर झाली आहे. महाराष्ट्रातील संघटनात्मक बांधणीवर भर देण्यासाठी ठाकरे गटाकडून विभागीय नेत्यांची यादी जाहीर करण्यात आलेली आहे. ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या दहा नेत्यांवर राज्यातील विभागवार संघटनात्मक तसेच आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने विशेष जबाबदारी सोपवली आहे.



# मोटार सायकल चोरीच्या आरोपीकडून मुरुड येथील एक तर पिंपरी चिंचवड पुणे येथील चार अशा एकूण पाच मोटारसायकली जप्त.पोलीस ठाणे मुरुडची कामगिरी.

लातूर :- मोटार सायकल चोरीच्या आरोपीकडून मुरुड येथील एक तर पिंपरी चिंचवड पुणे येथील चार अशा एकूण पाच मोटारसायकली जप्त.पोलीस ठाणे मुरुडची कामगिरी. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे स्तरावर पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने पोलीस ठाणे मुरुडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांचे नेतृत्वात पोलीस अमलदारांचे पथक पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पेट्रोलिंग करून माहिती संकलित करीत होते.

चोरीच्या गुन्ह्याच्या माहितीचे संकलन करीत असताना,




माहिती घेत असताना दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी मुरुड शहरात विनाक्रमांकाची हिरो होंडा मोटार सायकलवर दोन इसम संशयीतरित्या भरधाव वेगात वावरात असल्याचे दिसल्याने त्यास थांबवुन त्याचे याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव श्रीकृष्ण रामराव जाधव, वय २६ वर्ष, राहणार शिंदेवाडी तालुका माजलगाव जिल्हा बीड, नसिरुद्दीन रशीद सय्यद, वय २९ वर्ष, राहणार सीमरी पारगाव तालुका माजलगाव जिल्हा बीड असे असल्याचे सांगितले.

त्यास त्याचे ताब्यातील मोटरसायकल चे कागदपत्राबाबत विचारपुस केली असता, तो उडवा-उडवीची व संयुक्तिक उत्तरे देत नसल्याने त्याचेवर अधिक संशय वाढला.

सदर संशयीत इसमास पोलीस स्टेशन आणून त्याचेकडे कसुन चौकशी केली असता, मुरुड येथे त्याचे ताब्यातील मोटार सायकल चोरीची असल्याचे निष्पन्न झाले व त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने आणखी ०४ मोटार सायकली काढून दिल्या. अशा एकूण ०५ मोटार सायकली काढून दिल्या. मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्याचे अभिलेखाचे पाहणी केली असता वर नमुद ०५ मोटार सायकली पैकी ०४ मोटार सायकली पैकी एक मोटर सायकल पोलीस ठाणे दत्तवाडी जिल्हा पुणे शहर तर उर्वरित तीन मोटरसायकली पिंपरी चिंचवड येथील वाकड व पिंपरी चिंचवड पोलीस ठाण्याचे हद्दीतून चोरलेल्या निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधिक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर ग्रामीण) सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनाखाली मुरुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांच्या नेतृत्वात पोलीस अमलदार बाबासाहेब खोपे, बोईनवाड, राठोड, कीर्ते, नागनाथ जांभळे यांनी पार पाडली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE